-१-

अतिकालिक भत्ता

बृहन्मुंबई, जिल्हा व तहसील येथील कार्यालयांतील चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांना देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन,**
वित्त विभाग,
शासन निर्णय क्रमांक : अकाभ-1394/प्र.क्र.32/सेवा-9,
मंत्रालय, मुंबई-400 032 दिनांक : 29 मार्च, 1995.

पहा :- 1) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक जीसीएस-1382/सीआर-324/एसईआर-9, दिनांक 20 जुलै, 1982.

2) शासन निर्णय, वित्त विभाग क्रमांक : अकाभ-1388/सीआर-709/एसईआर-9, दिनांक 18 एप्रिल, 1990.

**शासन निर्णय** :- बृहन्मुंबई, जिल्हे व तहसील येथील कार्यालयांतील चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना कार्यालयीन वेळेनंतर कार्यालयीन कामासाठी थांबावे लागल्यास, मिळणा-या अतिकालीक भत्त्याचे दर वर दर्शविलेल्या शासन निर्णयान्वये ठरविण्यात आले होते. ते दर सुधारण्याचा प्रश्न काही काळ शासनाच्या विचाराधीन होता. शासनाने असे ठरविले आहे की, शासकीय कार्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना कामाचे दिवशी कार्यालयीन वेळेनंतर कार्यालयीन कामासाठी थांबावे लागल्यास त्यांना खाली दर्शविल्याप्रमाणे सुधारित दराने अतिकालिक भत्ता देण्यात यावा :-

(1) बृहन्मुंबईतील कार्यालयातील चतुर्थश्रेणी कर्मचारी :-

| | वेळा | सुधारित दर |
|---|---|---|
| संध्याकाळी | 7-00 ते 8-00 पर्यंत | रु. 6.00 |
| | 8-00 ते 9-00 पर्यंत | रु. 8.00 |
| | 9-00 नंतर | रु.10.00 |

(2) जिल्हे व तहसील या ठिकाणी असलेल्या कार्यालयांतील चतुर्थश्रेणी कर्मचारी

| | | |
|---|---|---|
| संध्याकाळी | 7-30 ते 9-30 पर्यंत | रु. 8.00 |
| | 9-30 नंतर | रु.10.00 |

ज्या चतुर्थश्रेणी कर्मचा-यांना अन्य कोणत्याही आदेशानुसार अतिकालिक भत्ता मिळत असेल त्यांना या आदेशानुसार अतिकालिक भत्ता मिळणार नाही.

2. सुधारित दर दिनांक 1 डिसेंबर, 1994 पासून अंमलात येतील.

जिल्हाधिकारी कार्यालय
रत्नागिरी.
8833
15 MAY 1995

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

श.स.बसनाक,
शासनाचे अवर सचिव.

प्रति,

महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-1, महाराष्ट्र, मुंबई (80 प्रती),
महालेखापाल (लेखापरीक्षा)-1, महाराष्ट्र, मुंबई (80 प्रती),

कृ.मा.प.